# प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0

- **शासन निर्णय :-**

  "प्रधानमंत्री आवास योजना " शासन निर्णय क्र.गृहनिर्माण विभाग प्रआयो-2024/प्र.क्र.87/गृनिधो-2(सेल) दि.15/10/2024 अन्वये प्रधानमंत्री आवास योजना शासन निर्णय पारित करण्यात आला आहे.

- मालेगाव महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजना 2.0 राबविण्यासाठी प्रशासक दप्तरी ठराव क्र. 234/2024-25 दिनांक 03/01/2025 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

- प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत केंद्र शासनाने नागरीकांना नविन अर्ज सादर करणेसाठी https://pmaymis2_2024.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करणेबाबत सुचित केले आहे.

- प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत BLC घटकाअंतर्गत राज्य शासनाकडून 1.0 लक्ष व केंद्र शासनाकडून 1.5 लक्ष असे एकुण 2.5 लक्ष अनुज्ञेय आहे.

- मालेगाव महानगरपालिका मालेगाव प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत मनपाच्या पोर्टलवर आजपावेतो एकुण 746 इच्छुक अर्जदारांनी अर्ज दाखले केले आहे.

- मनपास BLC घटकाअंतर्गत दाखल केलेल्या 564 अर्जदारांपैकी 266 अर्जदारांचे अर्ज छाणणी करण्यात आली आहे.

- एकुण छाणणी केलेल्या अर्जांपैकी 227 अर्जदारांचे प्रत्यक्ष घरकुलाच्या जागेवर जाऊन Geotagging करण्यात आले आहे.

- एकुण Geotagging केलेल्या घरकुलांपैकी अंतिम पात्र 188 लाभार्थ्यांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) शासनास मान्यतेकरीता सादर करण्यात आला आहे. सदरील अहवालास शासनाची मान्यता मिळाल्यास सदरील लाभार्थ्यांनाकडून आवश्यक असलेली बांधकाम परवानगी घेऊन अनुदान वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

- प्रलंबित अर्जांपैकी 135 अर्ज महानगरपालिकेस आवश्यक कागदपत्रांसहित प्राप्त नाहित सदरील अर्जादारांना संपर्क करुन अर्ज मागविण्याचे काम सुरु आहे. उर्वरीत अर्जदारांचे – कागदपत्रे पुर्तता, क्षेत्र कमी, सामाईक क्षेत्र , गुंठेवारी जागा , घरकुलाचे कामे पुर्ण इ. कारणांमुळे अर्ज प्रलंबित आहेत.